# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय:– शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद अंतर्गत बी.बी.ए., बी.बी.ए. (आय.बी.), बी.एम.एस., बी.सी.ए., बी.बी.ए. (सी.ए.), एम.बी.ए. इंटिग्रेटेड व एम.सी.ए. इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत...**

**संदर्भ :– १) मा. सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. बैठक–२०२५/प्र.क्र.४१/तांशि–४, दि. २०/०५/२०२५.**

**२) मा. संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२४–२५/१४७, दि. १०/०३/२०२५.**

**३) विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. शै.प्रवेश/७६२, दि. २५/०३/२०२५.**

**४) विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. शै.प्रवेश/८३९, दि. २८/०३/२०२५.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संदर्भ क्र. २ अन्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवीदिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड व एम.सी.ए. इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाना आहे त्या स्थितीत (As and where) परिषदेच्या अधिपत्याखाली अभ्यासक्रमात सहभागी होण्यास मान्यता दिलेली आहे. परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये तसेच तद्नंतरही बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड व एम.सी.ए. इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाना मान्यता प्रदान केली आहे. तसेच सदरहू अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत सामायिक प्रवेश परीक्षा आयोजित करून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश प्रक्रिया पार पडलेली आहे.

वरील अभ्यासक्रम हे प्रथमच शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत आले असून सदर अभ्यासक्रमांकरिता शैक्षणिक वर्ष २०२४–२५ हे संक्रमण कालावधी वर्ष आहे. संदर्भ क्र. २ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता संस्थांनी आकारणी करावयाचे शुल्क व अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीबाबत करावयाच्या कार्यवाहीबद्दल निर्देश देण्यात आलेले होते. त्यांस अनुसरून संदर्भ क्र. ४ परिपत्रकांन्वये तदर्थ शुल्क शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत असलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड व एम.सी.ए. इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमांकरिता निश्चित करून देण्यात आले होते.

संदर्भ क्र. १ येथील शासन पत्रान्वये प्राप्त निर्देशास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत असलेल्या बी.बी.ए., बी.बी.ए. (आय.बी.), बी.एम.एस., बी.सी.ए., बी.बी.ए. (सी.ए.), एम.बी.ए. इंटिग्रेटेड व एम.सी.ए. इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमां-करिता खालील प्रमाणे शुल्क निश्चित करण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | शिक्षण शुल्क रू. (Tution Fee Rs.) | विकास शुल्क रू. (Development Fee Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | B.B.A./B.B.A. (I.B.)/B.M.S./ M.B.A. (Integrated) | 35000/- | 3500/- |
| 2 | B.C.A./B.B.A. (C.A.)/ M.C.A. (Integrated) | 40000/- | 4000/- |

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी वरील प्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

विद्यापीठाचे परिपत्रक जा.क्र. शै.प्रवेश/७६२, दि. २५/०३/२०२५ व विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. शै.प्रवेश/८३९, दि. २८/०३/२०२५ रद्द समजण्यात यावे.

गणेशखिंड पुणे — ७
संदर्भ : शै. प्रवेश/१३९६
दिनांक : ०३/०६/२०२५

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**
मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx